महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

# नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण

जिल्हा परिषद भवन, जिल्हा परिषद, नाशिक - ४२२१०१

फोन नं. ०२५३- २९७७३७४

ई-मेल - mahakumbhanashik@gmail.com / kumbhmela.२०२७@mah.gov.in

क्र. नात्रिंकुंप्रा/आस्था/ जाहीरात / / २०२६ दिनांक: ०७/०४/२०२६

## जाहीरात

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा 2027 चे अनुषंगाने प्राधिकरणाकडे विविध न्यायालयीन प्रकरणे, करार विषयक बाबी, तसेच इतर विधी विषयक कामकाज मोठ्या प्रमाणात हाताळावे लागत आहे. सदर कामकाज प्रभावीपणे पार पाडण्यासाठी विधी सल्लागाराची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करणे आवश्यक आहे.

त्यानुसार नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या विधी विषयक कामकाजासाठी विधी सल्लागार व विषय तज्ञ म्हणुन, विषयांकीत प्रकरणातील निर्गमित शासन निर्णयातील तरतुदी नुसार प्रपत्र-ब मनुष्यबळ सेवा. (बाह्ययंत्रणेमार्फत / थेट जाहिरातीद्वारे) **'सल्लागार व विषय तज्ञ' या पदाच्या अंतर्गत सेवा करारपद्धतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबत निर्देशित केलेले आहे.**

विधी सल्लागार यांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करणेबाबत महसूल व वन विभागाचा दि. २५ एप्रिल २०२५ रोजीचा शासन निर्णय उपलब्ध आहे. त्यानुसार संदर्भ क्र. 2 अन्वये दरमहा रु.50,000/- (रु. 45,000/- मानधन + रु.5,000/- दूरध्वनी / प्रवास खर्च इतके मानधन देण्यात येईल.)

- संबंधित खर्च प्राधिकरणाच्या उपलब्ध निधीतून भागविण्यात येईल.
- नियुक्ती कालावधी - कुंभमेळा कालावधीपर्यंत / पुढील आदेशापर्यंत असेल.
- सदर पदासाठी शासकीय कामकाजाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक राहील.
- कंत्राटी सल्लागारास पूर्णवेळ प्राधिकरण कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक राहील. तसेच आवश्यकतेनुसार मा. उच्च न्यायालय व इतर न्यायालय येथे प्राधिकरणाच्या वतीने वेळोवेळी उपस्थित राहणे आवश्यक राहील.
- इतर अनुषंगिक अटी नियुक्ती आदेशात नमुद करण्यात येतील.

इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज हस्तलिखीत अथवा टंकलिखित करुन पुर्णपणे भरलेला असावा, अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्जावर अर्जदाराचा ईमेल आयडी व व्हाट्सअप क्रमांक नोंदविण्यात यावा.

अ. विहीत नमुन्यातील अर्ज उपरोक्त नमुद पत्त्यावर दिनांक- १५/०४/२०२६ या अंतिम दिनांकापर्यंत कार्यालयीन वेळेत Hardcopy प्रत स्वाक्षरीत अर्जासह पोहचतील अशा रितीने सादर करणे आवश्यक आहे. विहीत दिनांकानंतर तसेच पोस्टाव्दारे किंवा अन्य माध्यमाव्दारे प्राप्त होणा-या अर्जाची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

ब. अर्जासोबत २२ से.मी. x १२ से.मी. आकाराचा स्वतःचे नाव व पत्त्यासह पोस्टाचे रुपये ५/- चे तिकीट लावलेला लिफाफा जोडावा.

क. अर्जाचा विहीत नमुना नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण कार्यालय, जुनी जिल्हा परिषद इमारत नाशिक **येथे केवळ शासकीय कार्यालयीन वेळेत दि. १३/०४/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.**

स्वाक्षरी/-

(शेखर सिंह) (भा.प्र.से.)

कुंभमेळा आयुक्त

नाशिक त्रंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण